www.mumbaimitra.com  Email : mumbaimitramarathi@gmail.com

# मुंबई मित्र

9870695106  @dailymumbaimitra

मुंबई | उपनगर



## मरिन लाईन्समध्ये मराठी तरुणाला नोकरी नाकारली

### मराठी माणसाची गळचेपी सुरूच

■ प्रतिनिधी, मुंबई

महाराष्ट्रात सध्या मराठी माणसासोबत कोणत्या न कोणत्या गोष्टीवरून गळचेपी केली जात आहे, मग ती भाषेवरून असो किंवा एखाद्या हायक्लास सोसायटीमध्ये राहणाऱ्या मराठी कुटुंबाची असो. नुकत्याच काही घटना समोर आल्या ज्यामध्ये कल्याणमध्ये एका मराठी कुटुंबाला मारहाण करण्यात आल्याचा व्हिडीओ समोर आला होता.

त्यानंतर मुंब्र्यामध्ये एका मराठी भाषेत बोलणाऱ्या तरुणाला माफी मागायला लावली होती. असले प्रकार घडत असताना आता दक्षिण मुंबईतील एका तरुणाला तो मराठी असल्यामुळे नोकरी नाकारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

यासंदर्भातील एक व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल होतो. महाराष्ट्रातच होणारी मराठी माणसाची गळचेपी थांबायचे नाव घेत नाही.



मराठी मुले आम्हाला कामाला नको, मराठी मुले आमच्याकडे कामाला सूट होत नाहीत असे मरिन लाईन्स येथील राधेश्याम कंपनीकडून सांगण्यात येत तरुणाला नोकरी नाकारण्यात आली. मराठी मुले आमच्याकडे कामाला येतात आणि दोन दिवसांत सोडून जातात म्हणून आम्हाला मराठी मुले कामाला नको, असे कंपनीच्या मालकाने म्हटले आहे.

त्यानंतर त्या युवकाने लगेच घडलेल्या प्रकाराबद्दल शिवसेना दक्षिण मुंबई मध्यवर्ती कार्यालय येथे संपर्क साधला. तात्काळ दक्षिण मुंबईचे विभागप्रमुख संतोष शिंदे व कुलाबा विभाग अधिकारी विकास अडुळकर यांनी त्या संबंधित कंपनीच्या ऑफिसला भेट देत तेथील कंपनीच्या मालकाला या घटनेबाबत जाब विचारण्यात आला तसेच मराठी मुलांना महाराष्ट्रात राहून जर नोकऱ्या देणार नसाल तर शिवसेना स्टाईलने उत्तर देण्यात येईल अशी ताकीद देण्यात आली व यापुढे मराठी तरुणांना नोकरीत प्राधान्य देऊ असे आश्वासन दिल्यावर त्यांना समज देऊन सोडण्यात आले.

## शॉर्ट न्युज

### मांजरीच्या वादामुळे पाच वर्षांच्या मुलीला मारहाण

■ प्रतिनिधी, मुंबई

घरात पाळलेली मांजर लपवली म्हणून ३८ वर्षांच्या महिलेने पाच वर्षांच्या मुलीला जबरदस्त मारहाण करुन लोखंडी रॉडने चटके दिल्याची घटना समोर आली आहे. या



प्रकरणी मुलीने तिच्या घरी सांगितल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गोवंडी या ठिकाणी गुरुवारी ही घटना घडली. मुंबईतल्या गोवंडीमध्ये असलेल्या शिवाजी नगर भागात राहणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली आहे. पाच वर्षांच्या मुलीचे पालक मागच्या तीन महिन्यांपासून गोवंडी या ठिकाणी राहतात. त्यांच्या शेजारी ३८ वर्षांची एक महिला राहते. तिची मांजर लपवल्याने त्या महिलेने या पाच वर्षांच्या मुलीला मारहाण केली आणि तिला लोखंडी रॉडने चटके दिले.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला अटक

■ प्रतिनिधी, मुंबई

शुक्रवारी पोलिसांनी एका शिक्षकाला अटक केली आहे. धावण्याचा सराव करणाऱ्या मुलीवर या शिक्षकाने वर्गाचा दरवाजा बंद करुन अश्लील चाळे केल्याचा आरोप आहे. १२ वर्षांची पीडित मुलगी २७ डिसेंबरला शाळेच्या मैदानावर धावण्याचा सराव करत होती. त्यावेळी शारिरीक शिक्षण विषय शिकवणाऱ्या ३८ वर्षीय शिक्षकाने या मुलीला वर्गात नेले, दरवाजा लावून घेतला आणि तिच्याशी अश्लील चाळे केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शुक्रवारी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर सदर शिक्षकाला अटक करण्यात आली.

### मी मुख्यमंत्री पण होऊ शकतो- नरहरी झिरवाळ

■ प्रतिनिधी, मुंबई

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी शिरवाळ यांचे वक्तव्य चांगलेच चर्चेत आले आहे. मी २८८ जणांचे सभागृह चालवू शकतो तर मी मुख्यमंत्री पण होऊ शकतो., असे वक्तव्य अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलेच उधाण आले आहे. कल्याणमधील एका कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केले असून ते चर्चेत आले आहेत. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी जनतेशी संवाद साधताना सांगितले की, आदिवासी विकास मंत्री व्हावे मात्र माझे म्हणणे होते की, मी आदिवासी आहे म्हणून आदिवासी मंत्री होऊ का? मी कोणतंही मंत्रिपद सांभाळू शकतो., असे देखील त्यांनी सांगितले.

## 'उत्तर मुंबईतून भाजपचे ४० नगरसेवक निवडून आणणार : केंद्रीयमंत्री पियुष गोयल

### ट्रिपल इंजिन सरकार आणून मुंबईचा विकास करणार

मुंबई मित्र एक्सक्लूसीव



■ विशेष प्रतिनिधी, मुंबई

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपने तयारी सुरू केली असून भाजपचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर मुंबईतून भाजपचे ४० नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार खासदार आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला. सध्या राज्यात डबल इंजिन सरकार असून महापालिका निवडणुकीनंतर ट्रिपल इंजिन सरकार आणून मुंबईचा विकास करणार, त्यासाठी महापालिकेची निवडणूक लवकर होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील विविध कामांचा आढावा घेण्यासाठी पीयूष गोयल यांनी शनिवारी पालिका मुख्यालयात एका संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला मुंबई महापालिका, म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए, एमएसआरडी, जिल्हाधिकारी आदी विविध प्राधिकरणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पालिका आयुक्त भूषण गगराणी आणि एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत उत्तर मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. दहिसर, बोरिवली, कांदिवली, मालाड दरम्यानच्या या मतदारसंघातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित सर्व प्रकल्पांना गती देण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली. उत्तर मुंबई मतदारसंघात विविध प्राधिकरणांची ६० हजार कोटींची कामे सुरू असल्याचे गोयल यांनी सांगितले.

## राज्यात चिकुनगुनियाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ

■ प्रतिनिधी, मुंबई

राज्यात चिकुनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक ५,७५७ रुग्ण २०२४ मध्ये सापडले आहेत. त्यात पहिल्या क्रमांकावर नागपूर शहर आणि दुसऱ्या क्रमांकावर मुंबई आहे. यंदा रुग्ण मोठ्या संख्येने वाढल्याने वैद्यकीय वर्तुळात हा चर्चेचा विषय झाला आहे.

चिकुनगुनिया हा विषाणूजन्य आजार एडिस इजिप्ती आणि एडिस अल्बोपिक्टस डासांच्या संक्रमित मादीपासून फैलावतो. डेंग्यूसारखी लक्षणे असली तरी या आजारासाठी भिन्न उपचारांची आवश्यकता असते. राज्याच्या आरोग्य विभागामार्फत रुग्ण शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

याआधी चिकुनगुनिया आजाराचे रुग्ण राज्याच्या ग्रामीण भागात आढळत असत. आता मुंबईतही त्याच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. या आजारात लक्षणानुसार औषध दिले जाते.



**चिकुनगुनियाची लक्षणे**

चिकुनगुनिया झालेल्या रुग्णाला दोन ते बारा दिवस जास्त ताप येतो. सांधे दुखतात, काही रुग्णांमध्ये वेदना अनेक आठवडे, महिनेही टिकतात. चिकुनगुनिया झाल्यावर सांध्यांना सूज येते. आजारपणाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी अंगावर पुरळ येतो. तर चिकुनगुनिया झाल्यावर डोकेदुखी, डोके दाबल्यासारखे जाणवते.

आजूबाजूच्या परिसरात डास होणार नाही, याची दक्षता घ्या, डासांपासून संरक्षण करा. कुठल्याही प्रकारचा ताप आणि अंगदुखी असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे सेंट जॉर्जेस हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सांगितले आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ पर्यंत चिकुनगुनिया रुग्णांची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार या आजाराचे १२,५८७ रुग्ण आढळून आले आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ४,७९२ रुग्ण महाराष्ट्रात आढळले. तर दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटक आहे. तेथे २,२१३ रुग्ण आढळले आहेत.




■ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीकास्त्र डागले आहे. मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनातील आरोपी वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचे अत्यंत घनिष्ठ आणि नजीकचे संबंध असल्याचे वारंवार उघड होते आहे. वाल्मिक कराड यांच्या वडिलांचे निधन झाले त्यावेळी दिल्लीतील आपले सगळे कार्यक्रम सोडून धनंजय मुंडे बीडला परतले होते इतकेच नाही तर त्यावेळी त्यांनी "वडिलांचा मृत्यू हा किती वेदना देणारा असतो याची मला कल्पना आहे." अश्या स्वरूपाचे ट्वीट करून वाल्मिक कराड यांचे सांत्वन केले होते. धनंजय मुंडे मंत्रीमंडळाचा भाग असतील तर वाल्मिक कराड यांच्यावर कठोर कारवाई करणे सरकारला शक्य होणार नाही. त्यामुळे नैतिकतेच्या मुद्द्यावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा देणे आवश्यक आहे. महाविकास आघाडीच्या राजवटीत जेंव्हा मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते आम्ही त्यांचा राजीनामा घेऊन सर्वोच्च राजकीय नीतिमूल्यांचा आदर्श निर्माण केला होता. मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सुद्धा आरोप झाल्यावर राजीनामा दिला होता. त्यामुळे धनंजय मुंडे आणि महायुती सरकारने या मुद्द्याला आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न न बनवता सुसंस्कृत राजकीय आदर्श निर्माण करत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे आवश्यक आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

■ सर्वसामान्य नागरिक ते मुख्यमंत्री असा प्रवास करणाऱ्या एकनाथ शिंदे यांचे पाय कायमच जमिनीवर असतात. महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून कार्य करताना त्यांच्याकडे गृहनिर्माण खात्याची जबाबदारी आलेली आहे. या क्षेत्रात पाय ठेवल्या ठेवल्या त्यांनी आपली वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैली वापरण्यास प्रारंभ केला आहे. एकनाथजींनी जेष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माण योजनेची घोषणा केली आहे. असा प्रकल्प आखणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. त्यांनी गिरणी कामगारांच्या साठी एक लाख घरांच्या प्रकल्पाची घोषणा सुद्धा केली आहे. यापैकी जे गिरणी कामगार गावाला गेले असतील त्यांना त्यांच्या गावात घर दिले जाईल अशी पुस्ती सुद्धा त्यांनी जोडली आहे. विद्यार्थी आणि नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे बांधली जातील. इको फ्रेंडली आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून घरे बांधली जातील अशी घोषणा त्यांनी केली आहे. थोडक्यात एकनाथजींच्या नेतृत्वाखाली गृहनिर्माण मंत्रालय कात टाकून कामाला लागले आहे आणि याची मधुर फळे महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांना पुढील पाच वर्षात निश्चितच चाखायला मिळतील.

■ देवेन्द्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार सत्तारूढ झाले आहे परंतु अजूनही अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. आजवर प्रत्येक मंत्री आपल्याला अनुकूल असलेल्या सचिवांच्या आणि अधिकाऱ्यांचा नेमणुका करत असे. परंतु यावेळी देवेन्द्रजींनी सर्वाधिकार आपल्या हातात ठेवले आहेत. सर्व खात्यातील सचिव आणि अधिकाऱ्यांची नेमणूक ही मुख्यमंत्री कार्यालयातून होणार असल्याचे समजते आहे. अर्थात प्रशासकीय नियुक्त्यांच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस सर्व खात्यातील कामकाजावर नियंत्रण ठेवू शकतील. देवेन्द्रजींनी मुख्यमंत्री झाल्या झाल्या सर्वात पहिल्यांदा मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून आपल्या विश्वासातील अधिकाऱ्यांची तिथे नेमणूक केली. यात अश्विनी भिडे, श्रीकर परदेशी यांचा समावेश आहे. एकनाथ शिंदेंच्या कारकिर्दीत ठाणे सिंडीकेट तयार झाली होती. म्हणजे ज्या अधिकाऱ्यांनी कधीना कधी ठाण्यात नोकरी केली होती अश्या सर्व अधिकाऱ्यांना एकनाथ शिंदेंनी मोक्याच्या पदांवर नेमले होते. आता अश्या सर्व अधिकाऱ्यांची बदली करून त्यांना वेगवेगळ्या विभागात पाठवले जाते आहे. देवेन्द्रजींनी सुरु केलेल्या या नेमणुकांमुळे संपूर्ण प्रशासनावर त्यांचे नियंत्रण असेल आणि भ्रष्टाचार मुक्त प्रशासनाचे स्वप्न सत्यात येईल.

■ केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाने एक अत्यंत सुंदर आणि आवश्यक असा उपक्रम सुरु केला आहे. संपूर्ण देशाला भिकारीमुक्त करण्याची त्यांनी मोहीम आखली असून यातील पायलट प्रोजेक्ट मध्ये त्यांनी १० शहरे निवडली असून यापैकी एक शहर म्हणजे मध्य प्रदेशातील इंदोर आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता धारा १६३ अन्वये कोणत्याही प्रकारच्या भिक मागण्यावर कायदेशीर प्रतिबंध असून भिक मागणारा आणि भिक देणारा अश्या दोघांनाही यात शिक्षा करण्याचे प्रावधान आहे. या कायद्याअन्वये भिक मागणे, भिक मागणाऱ्याने काही वस्तू विकणे आणि अश्या वस्तूचे मूल्य देणारा किंवा भिक देणारा नागरिक याला एक वर्षाचा तुरुंगवास किंवा ५००० रुपये दंड लावला जाऊ शकतो. इंदोर च्या स्थानिक प्रशासनाने भिक मागण्यावर कायदेशीर बंदी तर घोषित केलीच आहे परंतु जोडीला त्यांनी भिक मागणाऱ्या व्यक्तीला पकडून देणाऱ्या नागरिकाला १००० रुपये बक्षिसाची घोषणा केली आहे. या मोहिमेअंतर्गत गेल्या चार महिन्यात इंदोर मध्ये ४०० भिकाऱ्यांना पकडून पुनर्वसन केंद्रात दाखल केले आहे ६४ लहान बालकांना सुधारगृहात दाखल केले आहे. इंदोर शहर प्रशासनाच्या या कार्याची प्रेरणा घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात सुद्धा ही योजना राबवणे अत्यंत आवश्यक झाले आहे. सिग्नलवरील भिकाऱ्यांमुळे वाहनचालक हैराण झालेले असतात आणि त्याच प्रमाणे रेल्वेमध्ये तृतीयपंथींय टोळी करून भिक मागतात त्यांच्या दहशतीमुळे सामान्य नागरिक घाबरून भिक देण्यास बाध्य होतात. या सगळ्यावर नियंत्रण स्थापित करणे आवश्यकच आहे.

## सागरी किनारा मार्गावरील बोगद्याजवळ हुल्लडबाजी करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई

■ प्रतिनिधी, मुंबई

सागरी किनारा मार्गावरील बोगद्याजवळ दोन युवक निष्काळजी व भरधाव वेगाने हुल्लडबाजी (कार रेसिंग) करत वाहने चालविताना आढळून आले आहे. यामधील वाहन क्रमांक एम. एच १२ एफ वाय ७२६३ या वाहनाचा सागरी किनारा रस्त्याच्या भिंतीला धडकून अपघात झाला. या वाहन चालकावर मलबार हिल पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र मोटार वाहन विभागाकडून एम एच १२ एफ वाय ७२६३ व एम एच ०३ एडब्ल्यू २२५५ ही वाहने दोन्ही वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यांना मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, दोन्ही वाहन चालकांचे परवाना तीन महिन्यांकरिता निलंबित करण्यात आला आहे. राज्यामध्ये १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. रस्ते अपघात नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीने सन-२०२५ या वर्षात रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त विविध विभागांमार्फत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेक शहरांमध्ये, विशेषतः महामार्गावर तरूण मुले बाईक रेसिंग अथवा कार रेसिंग करत असल्याचे आढळून आले आहे. याप्रकारे वाहन चालविणे हे मोटार वाहन कायद्याच्या भंग करणारे असून यामुळे निष्पाप नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे.

## मुंबईकरांची महागड्या वाहनांना पसंती; १४०० वाहनांची नोंदणी

### फेरारी, लेम्बोर्गिनीपासून ते ऑडीची खरेदी

■ प्रतिनिधी, मुंबई

२०२४ मध्ये मुंबईकरांनी महागड्या कारच्या खरेदीचा सपाटा लावला. मुंबईकरांनी २०२४ मध्ये महागड्या कार खरेदी करण्याचा विक्रम नोंदवला. १०-२० नव्हे तर १४०० महागडी वाहने नोंदवण्यात आली. फेरारी, लेम्बोर्गिनीपासून ते ऑडीची खरेदी करण्यात आली. मागच्या वर्षभरात मुंबईकरांनी महागडी वाहने खरेदी करण्यास पसंती दिली. या मायानगरीत महागड्या कारमुळे शासनाला महसूल सुद्धा मिळाला.

मुंबईकरांनी गेल्यावर्षी महागड्या कारला पसंती दिली.



जानेवारी ते डिसेंबर २०२४ या दरम्यान मायानगरीत १३५३ महागड्या आणि आलिशान कारची खरेदी करण्यात आली. या वाहनांची किंमत एक कोटीहून अधिक आहे. मुंबईत ताडदेव आरटीओमध्ये सर्वाधिक वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. बीएम डब्ल्यूने महागड्या गाड्यांमध्ये पहिला क्रमांक पटकावला आहे. कोरोना काळात दोन वर्षे नागरिकांची आर्थिक आवक थांबली होती. त्यानंतर गेल्या दोन वर्षात नागरिकांची आर्थिक गाडी हळूहळू रुळावर आल्यानंतर गेल्या काही दिवसात महागड्या गाड्या आयात करण्याचे प्रमाण वाढले आहे.

**iStreet Network Limited**

CIN L51900MH1986PLC040232

**Regd. Add.:** 107, New Sonal Link Ind Estate, Link Road, Malad West Mumbai 400064

**Website :** www.istreetnetwork.com **Email:** info@istreetnetwork.com **Contact:** +91 7972034739

**UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2024**

Rs. In lacs except EPS

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31.12.24 Un-Audited | Quarter ended 30.09.24 Un-Audited | Quarter ended 31.12.23 Un-Audited | Nine Months ended 31.12.24 Un-Audited | Nine Months ended 31.12.23 Un-Audited | Year Ended 31.03.2024 Audited |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from operations | - | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.11 | 0.09 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax,Exceptional and/or Extraordinary items) | (3.17) | (3.68) | (2.98) | (10.18) | (9.57) | (12.92) |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (3.17) | (3.68) | (2.98) | (10.18) | (9.57) | (12.92) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (3.17) | (3.68) | (2.98) | (10.18) | (9.57) | (12.92) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (3.17) | (3.68) | (2.98) | (10.18) | (9.57) | (12.92) |
| 6 | Paid-up Equity Share Capital | 852.00 | 852.00 | 852.00 | 852.00 | 852.00 | 852.00 |
| 7 | Earnings per Share (Par Value Rs. 4 each) (Not annualised) Basic and Diluted | (0.01) | (0.02) | (0.01) | (0.05) | (0.04) | (0.06) |

**Notes:**

1. The above un-audited financial result has been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors in their meeting held on 4th January 2025.
2. The Statutory Auditors of the company have carried out the Limited Review of the results of the Company and issued a Limited Review Report, now attached herewith.
3. The company is actively pursuing several business and services opportunities including that of in the area of Artificial Intellegence(AI). Substantial work is in progress and company is hopeful to launch it services soon and accordingly it is continued to be a 'going concern'. At the same time, the company is also in the process of raising money needed for its new business opportunities.
4. The financial results have been prepared in accordance with recognition and measurement principles laid down in Indian Accounting Standards 34, Interim Financial Reporting (Ind AS 34), prescribed under section 133 of the Companies Act, 2013 ('the Act') and other accounting principles generally accepted in India and is in compliance with the presentation and disclosure requirements of Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015 (as amended).
5. Previous period/year figures have been regrouped re-arranged, wherever necessary, to confirm to current year/quarter presentation.

By Order of the Board
Meenu Malu
Managing Director
DIN:00444932

Place : Mumbai
Dated : 4th January 2025

सिडको
शहरांचे शिल्पकार

**बोली मागणी सूचना**

**सेक्टर - १५, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई येथे डिमांड रजिस्ट्रेशन स्किम (डीआरएस) अंतर्गत सेवेमध्ये असलेल्या खासदार / आमदार/ नगरसेवक, सुप्रिम कोर्ट आणि हाय कोर्ट न्यायाधिश / आयएएस/ आपीएस अधिकाऱ्यासाठी आरक्षीत भूखंडाकरिता पोहोच मार्गाचे बांधकाम.**

सिडको महाराष्ट्र लिमिटेड खालील नमूद कामासाठी, ज्यांनी एम. एस. पाईप पुरविणे आणि अंथरणे यासारखे तत्सम स्वरूपाचे कार्य पूर्ण केले आहे अशा सिडको लि. किंवा केंद्र सारकार, किंवा महाराष्ट्र राज्य सरकार आणि त्यांच्या उपक्रमांकडे योग्य वर्ग आणि श्रेणीमध्ये नोंदणीकृत असलेल्या, अनिवार्य पात्रता अर्हतांची पुर्तता करणाऱ्या अनुभवी प्रस्तावित बोलीदारांकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे ''ऑन लाईन '' बाब दर शतमान बोली मागवित आहेत : **१. कामाचे नाव : सेक्टर - १५, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई येथे डिमांड रजिस्ट्रेशन स्किम (डीआरएस) अंतर्गत सेवेमध्ये असलेल्या खासदार / आमदार/नगरसेवक, सुप्रिम कोर्ट आणि हाय कोर्ट न्यायाधिश / आयएएस/आपीएस अधिकाऱ्यासाठी आरक्षीत भूखंडाकरिता पोहोच मार्गाचे बांधकाम. २. सी. ए. क्र. :** ०२/सिडको/ईई (एमएचपी - ४)/२०२४ - २५ **३) बोलीसाठी ठेवलेले मूल्य :** रु. ७४,६०,०४७.०० (जीएसटी वगळून) ( रु. ६७,२५,०३५.०० बोलीयोग्य भाग + रु. ७,३५,०१२.०० बिगर बोलीयोग्य भाग ) ४. इ. र. ठे. : रु.७५,०००/- **५. नोंदणी वर्ग :** वर्ग - ४ आणि वरील (स्थापत्य कार्य). **६. समापन कालावधी :** ९० (नव्वद ) दिवस (मानसून सहीत) **७. निविदा प्रक्रिया शुल्क :** रु. ५,९००/- (१८% जीएसटी समाविष्ट (ना-परतावा) ) बोली कार्यक्रमासह बोली दस्तावेज ०७/०१/२०२५ रोजी १७.०१ वा. पासून संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध होईल.

अधीक्षक अभियंता
(एचएसजी-। आणि एनटी)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३८१/२०२४-२५